अमरावतीत खेळणी दुकानाला भीषण आग

लाखो रुपयांचे खेळणे आगीत स्वाहा

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 10) - जयस्तंभ चौक परिसरातील कोतवाली ठाण्यासमोर असलेल्या एका खेळणीच्या दुकानाला रविवारी 10 नोव्हेंबर रोजी सायंकाळी भीषण आग लागली. या आगीत दुकानातील खेळणे व अन्य साहित्य जळून खाक झाले. त्यात लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. अथक परिश्रम करून अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविले. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली होती. काही काळ या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

रामपुरी कॅम्प परिसरातील कृष्णानगर येथील रहिवासी विजय बजाज यांचे जयस्तंभ चौक-श्याम चौक मार्गावर बजाज खिलोना सेंटर नावाचे खेळणी विक्रीचे दुकान आहे. रविवारी सायंकाळी त्यांच्यासह कर्मचारी आपापल्या कामात व्यस्त होते. त्याचवेळी दुकानातील वरच्या माळ्यावर अचानक आग लागली. ही बाब लक्षात येताच विजय बजाज यांच्यासह कर्मचारी दुकानाबाहेर पडले. त्यांनी तातडीने अग्निशमन दलाला माहिती दिली. त्याचवेळी आगीने रौद्ररुप धारण केले. दुकानाच्या वरच्या माळ्यावरून आग खालच्या माळ्यावर पसरली. त्यामुळे दुकानातून आगीचे प्रचंड लोळ निघू लागले. या प्रकाराने परिसरात एकच खळबळ उडाली. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळ गाठून आग विझविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. अथक परिश्रमाअंती अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविले. तोपर्यंत या आगीत दुकानातील खेळणे व अन्य साहित्य पूर्णत: जळून खाक झाले. त्यात लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. या आगीची शेजारी असलेल्या इतर खेळणी विक्रेत्यांच्या दुकानांना काही प्रमाणात झळ बसली. या घटनेमुळे या मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. खबरदारीचा उपाय म्हणून या परिसरातील वीज पुरवठा खंडित करण्यात आला होता. आगीचे नेमके कारण कळू शकले नसले, तरी शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज आहे. गेल्या सप्टेंबर महिन्यात बडनेरा मिनी बायपास मार्गावरील एमआयडीसी परिसरात राम इंडस्ट्रिज या खाद्यतेल कंपनीच्या कारखान्याला भीषण आग लागली होती. या घटनेची माहिती अग्निशमन दलाला देण्यात आल्यानंतर पथकाने तातडीने घटनास्थळी पोहोचून आगीवर नियंत्रण मिळवले होते. या कारखान्यात खाद्यतेलाचा साठा असल्याने आग पसरण्याचा धोका निर्माण झाला. सुरुवातीला एमआयडीसी परिसरातील वीज पुरवठा बंद करण्यात आला आणि त्यानंतर उच्च दाबाच्या बंबांमधून पाणी फवारण्यात आले होते.

सुदैवाने जिवितहानी नाही

या घटनेच्या माहितीवरून तत्काळ महापालिकेच्या अग्निशमन विभागाने घटनास्थळ गाठून आगीवर पाण्याचा मारा केला. तब्बल 19 पाण्याच्या बंबांने आग नियंत्रण आणण्याचे प्रयत्न चालविले गेले. त्यावेळी सायंकाळी 7.30 च्या सुमारास आग आटोक्यात आली. सुदैवाने यामध्ये कुणाचीही जिवीतहानी झाली नसल्याची माहिती आहे.

दर्यापुर हद्दीतील कुख्यात इसमावर एमपीडीए

महासागर प्रतिनिधी

अमरावती(दि.10) - दर्यापूर येथील कुख्यात धोकादायक इसम साहिल ऊर्फ बंटी बाळकृष्ण वाकपांजर, (वय 21 वर्ष, रा. थिलोरी. ता. दर्यापुर, जि अमरावती) हा पोलीसांचे कारवाईला न जुमानता स्वत: तसेच साथीदारांसह शरीराविरुद्धचे व मालमत्तेविरुध्दचे दखलपात्र स्वरुपाचे गुन्हे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, नागरिकांना गैरनिरोध करणे यासारखे गुन्हे करण्यामध्ये गुंतलेला होता. त्याने दर्यापुर व अमरावती शहरातील परिसरामध्ये गुंडप्रवृत्तीचा इसम म्हणुन ओळख निर्माण करुन नागरिकांमध्ये दहशत निर्माण केली होती. त्याचेमुळे सार्वजनिक व वैयक्तीक मालमत्तेस व जिवितास मोठ्या प्रमाणात बाधा निर्माण होवुन लोकांचे मनात असुरक्षिततेची व भितीची भावना निर्माण झाली होती. नमुद इसमाविरुद्ध उघड-उघड तक्रार देण्यास कोणीही धजावत नव्हते. यापुर्वी सुध्दा त्यास एक वर्षाकरीता अमरावती जिल्हयातुन हददपार करण्यात आले होते. तरी सुध्दा त्याचेवर वेळोवेळी करण्यात आलेल्या प्रतिबंधक कारवाईचा त्याचे वर्तणुकीवर काही एक परिणाम झाल्याचे दिसुन येत नव्हते. परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी व कुख्यात धोकादायक इसमाचे गुन्हेगारी वृत्तीस आळा घालण्यासाठी पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रामीण यांनी त्यास एमपीडीए कायद्यान्वये एक वर्षाकरीता स्थानबद्ध करण्याचा प्रस्ताव जिल्हादंडाधिकारी, अमरावती यांचेकडे सादर केला होता, जो मंजूर करण्याता आला.

सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे 51 लाख उडविले

बँक ऑफ इंडियातील घटना

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.10)- शहरातील एका सेवानिवृत्त अधिकाऱ्याने बँक ऑफ इंडियामध्ये ठेवलेले मुदत ठेवीची 51 लाख 65 हजार रुपयांची रक्कम कुणीतरी लंपास केली. सेवानिवृत्त अधिकारी मुकुंद अंबादास कुऱ्हेकर यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी 8 नोव्हेंबर रोजी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

स्वस्तिक नगरातील रहिवासी मुकुंद कुऱ्हेकर हे निवृत्त अधिकारी आहेत. त्यांची पेन्शन नवाथे बगिच्याजवळील बँक ऑफ इंडियामध्ये जमा होता. निवृत्तीनंतर मिळालेल्या पैशांतून त्यांनी काही रक्कमेची बँकेत मुदत ठेव केली होती. परंतू त्यापैकी 5 ते 7 नोव्हेंबर दरम्यान अज्ञात आरोपीने त्यांच्या मुदत ठेवीतून 51 लाख 65 हजार रुपये काढून घेतले. मुकुंद कुर्हेकर यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी कोणतेही मोबाइल ॲप किंवा

ऑनलाइन व्यवहार केला नसतानाही त्यांच्या मुदत ठेवीतून ही रक्कम काढण्यात आली. मुकुंद कुऱ्हेकर यांना ही माहिती मिळताच त्यांनी तात्काळ राजापेठ पोलिस ठाण्यात जाऊन या प्रकरणाची तक्रार दिली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन राजापेठ पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक पुनित कुलट यांनी 9 नोव्हेंबर रोजी या प्रकरणाचा तपास सायबर सेल पोलिसांकडे सोपविला. मुकुंद कुऱ्हेकर यांनी फिर्यादीत सांगितले की, त्यांचा मुलगा परदेशात राहतो. पत्नी आजारी असल्याने त्यांच्यावर नागपुरात उपचार सुरू आहेत. दोन वर्षांपासून ते नागपुरातील अंबाझरी येथील वृद्धाश्रमात राहत होते.

ट्रकवरून खाली पडल्याने एकाचा मृत्यू

अमरावती - ट्रकवरून खाली पडल्याने एका इसमाचा मृत्यू झाला. ही घटना चांदुररेल्वे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घुईखेड परिसरात घडली. प्रकाश गोविंदराव गिरी (40, रा. घुईखेड, चांदुररेल्वे) असे मृताचे नाव आहे. 5 नोव्हेंबर रोजी प्रकाश गिरी हे ट्रकवरून खाली पडले होते. त्यांना काही नागरिकांनी तत्काळ पीडीएमसी या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेची माहिती अशोक प्रल्हाद खुरवटे यांनी गाडगेनगर पोलिसांना दिली. त्यानुसार पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

राज्यकर्त्यांनी चांगली पिढी घडविली पाहीजे : डॉ.विश्वकर्मा

बिरसा मुंडा संघटनेने दिला पाठींबा

महासागर प्रतिनिधी

धामणगांव रेल्वे, (दि.10) - जिल्ह्यात सध्यास्थितीत गुन्हेगारीने कळस गाठला आहे. अल्पवयीन मुले भरचौकात देशी कट्टे काढत आहेत. भाजपा इडीची भीती दाखवून आपला पक्ष वाढवित आहे. भाजपाला मतदान करणे म्हणजे भ्रष्टाचाराला वाव देणे आहे. असा घणाघात वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. निलेश विश्वकर्मा यांनी केला. बिरसा मुंडा संघटनेने त्यांना पाठींबा दिला. यावेळी ते शास्त्री चौकातील आपल्या प्रचार कार्यालयासमोर बोलत होते.

राज्यकर्त्यांनी चांगली पिढी घडविली पाहीजे आजच्या घडीला युवक गुन्हेगारीच्या विळख्यात अडकत चालला आहे. मात्र भाजपा दुसऱ्यांचे पक्ष फोडण्यात गुंग आहे. धामणगाव रेल्वे मतदार संघात भाजप व काँग्रेस ने आलटून-पालटून सत्ता भोगली, मात्र मतदार संघातील समस्या सोडविल्या नाहीत. मतदार संघात सध्या तिहेरी लढतीचे चित्र निर्माण झाले आहे, घाबरलेली काँग्रेस नकारात्मक प्रचार करीत आहे. वंचित आघाडी मत घेत नाही, असे सांगुन लोकांमध्ये संभ्रम निर्माण केल्या जात आहे. मात्र मतदार संघातील परिस्थिती वेगळी आहे. वंचित बहुजन आघाडीला वाढता जनाआधार पाहून आहे. विरोधकांची भंबेरी उडाली आहे. यातूनच असे वक्तव्य केले जात असल्याचे विश्वकर्मा म्हणाले. घरोघरी जाऊन सिलेंडर ला मत मागावे असे आवाहन डॉ. निलेश विश्वकर्मा यांनी केले. यावेळी मोहोड सी, प्रशांत नाईक, किशोर राऊत यांच्या सह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. तर बिरसा मुडा संघटनेचे संतोष कन्हाडे, अमोल कुमरे, श्रीकांत वरठी, सनी मेश्राम, अजय धुर्वे, आशिष पुरान, देवानंद कन्हारे, उमेश कन्हाडे, अभय करपते यांनी बिरसा मुंडा यांचा फोटो विश्वकर्मा यांना देत विजयी होण्याकरिता शुभेच्छा दिल्या.

एटीएम बदलून 20 हजाराने गंडविले

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.10) - हर्षराज कालनीतील एसबीआय एटीएमवर पैसे काढण्यासाठी गेलेल्या एका वृध्द व्यक्तीचे एटीएम अदलाबदल करून, त्यांच्या खात्यातून 20 हजाराची रोख काढण्यात आली. या घटनेची तक्रार दिपक केशवराव मानकर (60, रा. नवसारी) यांनी 9 नोव्हेंबर रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला.

दिपक मानकर यांच्या तक्रारीनुसार, ते एटीएममधून पैसे काढण्यासाठी गेले होते. त्यावेळी तेथे हजर असणार्या आरोपीने दिपक मानकर यांच्याजवळील एटीएमची अदलाबदली केली. ते एटीएम राजेंद्र सदाशिव ओराहडे या नावे होते. त्यानंतर दिपक मानकर यांच्या खात्यातून 10 हजाराची रक्कम दोन वेळा काढल्याचे संदेश त्यांना प्राप्त झाली. त्यामुळे अज्ञाताने आपली फसवणूक केल्याचे दिपक यांच्या लक्षात आले. त्यांनी या घटनेची तक्रार गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली.

कुऱ्हाड दाखवित जीवे मारण्याची धमकी

इर्विन चौकातील घटना

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि.10) - इर्विन चौक स्थित एका दुकानात एक इसम कुर्हाड घेऊन शिरला आणि त्याने काऊन्टरवर कुर्हाड ठेऊन महिलेसह रामदास सोनवाल यांना जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना 8 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 6 वाजताच्या सुमारास घडली. या घटनेची तक्रार महिलेने सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात दिली असून, त्यानुसार पोलिसांनी आरोपी सागर श्रीकांत शर्मा याच्याविरुध्द बीएनएस कलम 296, 351 (3) नुसार गुन्हा नोंदविला आहे. भर दिवसा गजबजलेल्या इर्विन चौकात घडलेल्या या घटनेमुळे प्रचंड खळबळ उडाली होती.

इर्विन चौक हा मोठ्या वर्दळीचा असून, या चौकातून सतत वाहनांची वर्दळ सुरु असते. अशातच सुरज होटलच्या बाजुलाच असणार्या एका दुकानात एक हातात कुर्हाड घेऊन शिरला आणि त्याने तेथील एका महिलेसह रामदास सोनवाल यांना अश्लिल शिविगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेच्या माहितीवरून सीटी कोतवाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन आरोपी सागर शर्माला ताब्यात घेतले.त्याच्याजवळील कुर्हाड जप्त करून, त्याला पोलिस ठाण्यात नेले.

बच्चुंच्या लाडक्या बहिणी पाहून महायुती कोमात

कुरळपूर्णा येथे महिलाशक्तीने केला विजयाचा संकल्प

महासागर प्रतिनिधी

चांदुर बाजार, (दि.10)- लोकसभा पराभवानंतर महायुतीने लाडकी बहीण योजना अंमलात आणली. महिलांनी महायुतीला भरभरून मते द्यावी एवढाच यामागील उद्देश होता. मात्र अचलपूर मतदार संघातील लाडक्या बहिणींनी महायुतीच्या या उद्देशाला हरताळ फासत परिवर्तन महशक्तीचे उमेदवार लोकनेता बच्चू कडू यांच्या विजयाचा संकल्प केला. तालुक्यातील कुरळपूर्णा येथे महिलाशक्तीच्या झालेल्या भव्य मेळाव्यात महिलावर्गांनी बच्चू कडू यांच्या कार्याप्रती आदर दाखवत त्यांना विजयाच्या शुभेच्छा दिल्या.

बच्चू कडू यांच्या प्रमुख उपस्थितित पार पडलेल्या या महिला मेळाव्याला माजी जि.प.सदस्य कविता दामोदर, पं.स. सदस्य सुनीता झिंगरे, वंदना भोकसे, फुबगाव येथील सरपंच सविता किटूकले, उपसरपंच सुषमा पळसपगार, झिंगरे, स्टेला, पद्मा मेसकर, अनिता दाकडे, शारदा सहारे आदी मान्यवर महिला शक्ती उपस्थित होती.

स्टेला यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हटले की, बच्चू कडू यांनी मागील वीस वर्षांत केवळ जनतेच्या भावनांचा आदर केला, त्यांनी जाती धर्मापलीकडे जाऊन केवळ मानवतेच्या नात्याने रुग्णसेवा केली.आजकाल सर्वत्र जाती धर्माचे वेड लागले असतांना केवळ बच्चू कडू यांनी या गोष्टीला छेद देत सामाजिक कार्याला वाहून घेतले आहे. आज अचलपूर मतदारसंघच नव्हे तर अख्या महाराष्ट्राला बच्चू कडू यांच्या कार्याची जाणीव आहे त्यामुळे यावेळी सुद्धा महिलाशक्ती ही बच्चू कडू यांच्या बाजूने भक्कमपणे उभी असल्याची भावना महिलांच्या वतीने त्यांनी मांडली.

आपली सुरक्षा माझी जबाबदारी-बच्चू कडू

महिलाशक्तीने आयोजित केलेल्या या महिला मेळाव्याला संबोधित करतांना बच्चू कडू म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांवर प्रहार जनशक्ती पक्ष कार्यरत असून सामाजिक सेवेचा वसा जोपासत आपण गेल्या पंचवीस वर्षांपासून गोरगरिबांची व दिव्यांगांची सेवा करत आहोत. महिलाशक्ती मोठ्या संख्येने माझ्या पाठीशी आहे याचा अभिमान आहे. मतदार संघातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील महिलांच्या सुरक्षेची जबाबदारी माझी असून या निवडणुकीनंतर महिला सुरक्षेसंबंधी ठोस निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन बच्चू कडू यांनी दिले.

याप्रसंगी उपस्थित महिलांनी बच्चू कडू यांचे औक्षण करत त्यांच्यावर पुष्पवर्षाव केला. यावेळी महिलांनी 'बच्चू भाऊ तुम आगे बढो' च्या घोषणा दिल्या.

लवटेंच्या प्रचारातून खासदारांचा काढता पाय?

त्यांचे हात 'बळकट' करताना आपले हात 'मळकट' होण्याची भीती

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.10)- माजी आमदार व विद्यमान खासदार बळवंत वानखडे यांनी दर्यापूर मतदारसंघाला काँग्रेसचा गड बनविला. मतदारसंघात काँग्रेसला मजबूत केले. असे असताना आता मात्र आपल्या या विधानसभा मतदारसंघात उबाठा शिवसेनेचे उमेदवार गजानन लवटे यांच्या प्रचारातून खासदारांनी काढता पाय घेतल्याचे दिसत आहे. उमेदवाराचे हात 'बळकट' करताना आपला हात 'मळकट' होण्याची भीती असल्याने, ही वैयक्तीक आचार संहिता खासदार पाळत असल्याची माहिती आहे.

दर्यापूर विधानसभा मतदारसंघातील जागेवरुन महाविकास आघाडीतील घटक पक्ष काँग्रेस आणि शिवसेनेमध्ये चांगलीच ओढताण झाली. काँग्रेसचा एक गट दर्यापूर मतदारसंघ कोणत्याही परिस्थितीत काँग्रेसलाच सुटावा याकरिता आग्रही होता. त्या गटामध्ये बळवंत वानखडे हे अग्रस्थानी होते. त्यांना माहित असावे की, ही जागा उबाठा शिवसेनेला सुटल्यास

मतदारसंघातील नामांकीत वाईन बार (दारु अडडा) चालक गजानन लेवटे हे उमेदवार राहतील, ज्यांना जनाधार मिळणे तर दुरच, उलट जे त्यांच्या सोबत उभे ठाकतील, त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन

जनतेचा बदलु शकते, कदाचित अशी भीती निर्माण झाल्याने खा.वानखडेंनी लवटेंच्या प्रचारातून काढता पाय घेतला. खासदारांचे स्वगृह असलेल्या दर्यापूर मतदारसंघात काँग्रेस फक्त सभेपुरती दिसत आहे. नाकासाठी शेंभडाचा विचार न करता आपण अलिप्त रहावे, अशी भूमिका मित्र पक्षांची दिसत आहे. दुसरीकडे शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेसही पाहीजे तसे लवटेंच्या पाठीशी दिसत नाही. त्यामूळे हा उमेदवार महाविकास आघाडीचा नसून फक्त उबाठा शिवसेनेचाच असल्याचे चित्र मतदारसंघात उमटत आहे. त्यामूळे स्वच्छ चारित्र्याचे अपक्ष उमेदवार मतदारसंघात बाजी मारुन जातील असा कयास मतदारराजा लावत आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

गुटखा तस्करीवरील कारवाई विरली हवेत?

शिरजगाव पोलीसांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात

महासागर प्रतिनिधी

चांदूर बाजार,(दि.10)– तालुक्यातील शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील करजगावात मंगळवारी (दि.5) दुपारी 2 वाजता दरम्यान झालेल्या गुटखा कारवाईची चर्चा चांगलीच रंगली आहे. स्थानिक पोलिसांनी दुजोराही दिला. मात्र ती कारवाईत गुटखा मिळालाच नसल्याची दुसरे दिवशी पुढे आले.

शिरजगाव कसबा ठाण्याच्या हद्दीतील गावे हे गुटखा तस्करीचे माहेर घर आहे. आयपीएस निकेतन कदम यांचे नंतर मोठी

कारवाई करण्यात आली नाही हे विशेष आहे.

शिरजगाव पोलिसांनी करजगाव येथील बहिरम मार्गावर एका घरातून कारवाई करत लाखोचा गुटखा जप्त केल्याची बातमी गावात वाऱ्यासारखी पसरली. त्यामुळे गुटखा माफियांचे काही काळ का होईना धाबे दणाणले होते. त्यात कारवाई होत असल्याची पुष्टी स्वत: पोलीस कर्मचाऱ्यां केली. परंतू दुसऱ्या दिवशी ही कारवाई शेवटावर गेलीच नसल्याचे बाहेर आले. पोलीस घटनास्थळी गेले होते परंतु त्यांना सुगंधित सुपारी मिळाली त्यामुळे गुटखा न मिळाल्याने गेल्यापावली परत आले असल्याची माहिती शिरजगाव कसबा चे ठाणेदार महेंद्र गवई यांनी दिली.

गुटखा सुपारीत रुपांतरीत

गुटखा कारवाई करत असल्याचे खुद्द पोलीस कर्मचारी सांगत होते. मग दुसऱ्या दिवशी तो गुटखा सुगंधित सुपारीत रुपांतरीत कसा झाला? अश्या चर्चांना पेव फुटले आहे.

करजगाव येथे बोदड मार्गावर एका व्यक्तीचे घरी धाड टाकली असता गुटखा आढळून आला नसून फक्त सुगंधित सुपारी, निसर्ग पूडी मिळाल्या .

हेंद्र गवई, सहा.पोलीस निरीक्षक

पोलिसांनी कारवाई केली तेव्हा एक गाडी गुटखा माल जप्त केला होता. त्यांनतर संबधित व्यक्तिला सोबत नेले होते.

प्रत्यक्षदर्शी नागरिक

घड्याळ नको, कमळ आणा!

अमित शहांचा चक्क राष्ट्रवादी विरोधात प्रचार

पाच मिनिटांत उरकलं भाषण

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 10) – मोर्शी विधानसभा मतदारसंघात महायुतीमध्ये बिघाडी झाली होती. येथे राष्ट्रवादीनं आपला उमेदवार दिलाय. या मतदारसंघात आम्ही भाजपाचा उमेदवार दिला. मोर्शी विधानसभा मतदारसंघात आम्हाला केवळ कमळ हवं, घड्याळ अजिबात नको, असं देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं. मोर्शी विधानसभा मतदारसंघात वरुड येथं भाजपाचे उमेदवार उमेश उर्फ चंद्रकांत यावलकर यांच्या प्रचारासाठी आयोजित जाहीर सभेला अमित शाह यांनी संबोधित केलं.

राज्यात महायुती एकत्र निवडणुका लढत आहे. तर मोर्शी या मतदारसंघात भाजपाकडून उमेश यावलकर तर राष्ट्रवादीकडून विद्यमान आमदार देवेंद्र भुयार हे रिंगणात आहेत. त्यामुळं येथे महायुतीत बिघाडी झाल्याचं दिसत आहे. दरम्यान, भाजपा उमेदवाराच्या प्रचारासाठी मोर्शीत अमित शाह दाखल झाले होते. यावेळी त्यांनी महायुतीतील घटकपक्ष असलेल्या राष्ट्रवादीचं घड्याळ नको म्हणत भाजपाचं कमळ आणायचं आवाहन कार्यकर्त्यांना केलं. आज आम्ही आमचा जाहीरनामा मुंबईत जाहीर केला. यामुळं मोर्शी विधानसभा मतदारसंघात जाहीर सभेसाठी येण्यास उशीर झाला. आज मी फारसं बोलणार नाही. मोर्शी विधानसभा मतदारसंघात महायुतीच्या उमेदवारांना विजयी करा, असं आवाहन मी सगळ्यांना करतो. आज मी वेळ देऊ शकत नाही, यामुळं मला माफ करा. मात्र, मोर्शी विधानसभा मतदारसंघात भाजपाचे उमेदवार उमेश यावलकर निवडून आले की, विजयी मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी नक्की येईन, असं आश्वासन अमित शाह यांनी दिलं. खासदार अनिल बोंडे, माजी खासदार रामदास तडस यावेळी उपस्थित होते.

'डीपीएस'मध्ये विविध स्पर्धा संपन्न

अमरावती – दिल्ली पब्लिक स्कुल (डीपीएस) मध्ये %सृजन% अंतर्गत आंतरसमूह स्पर्धेचा विविधारंगी कार्यक्रम नुकताच पार पडला. डीपीएसच्या प्रांगणात हा कार्यक्रम घेण्यात आला. शहरातील नृत्य शिक्षिका संस्कृत्ती वाघोलकर, संगीत शिक्षिका स्वामिनी सहारे व गजानन संस्थेच्या सदस्या मीरा कात्रे यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विदेशी व भारतीय लोकगीते गायन आणि नृत्यांवर सादरीकरण केले विद्यार्थ्यांनी त्यांच्या सूत्रसंचालनाने कार्यक्रमाचा स्तर उंचावला.

दृष्टिहीन बेरोजगारांच्या मदतीसाठी मराठी नाटक

अमरावती – अभिव्यक्ती अमरावती द्वारानिर्मित दोन अंकी नाटय थैंक्यू मिस्टर ग्लाड या नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, 17 नोव्हेंबर रोजी सायंकाळी सात वाजता श्री. संत ज्ञानेश्वर सास्कृतिक सभागृह अमरावती येथे हे नाटक होणार आहे. राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्र विभागीय शाखा अमरावती व अभिजात मराठी शिक्षक साहित्य परिषद महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने दृष्टीहीनांच्या सर्वांगीण विकासाकरिता मदत व्हावी, म्हणून हे नाटक आयोजित आहे. या नाटकाचे लेखक अनिल बरी, दिग्दर्शक प्रा. मंगेश बक्षी, कलावंत मनोज सामदेकर, मंगेश बक्षी, किशोर तळोकार, तुषार सोरगीवकर, विनायक लांजेवार, अनिल कड़, संजय तिवडकर, शुभम वैद्य, नितीन शहाकार, मृणाल ढोले, शुभांगी करुले आहे.

अनोळखी मोबाईल क्रमांकावरून राजकीय पक्षांचा प्रचार

महासागर प्रतिनिधी

पथ्रोट,(दि.10)–मोबाईलवर येणाऱ्या अनोळखी जाहिरातींच्या फोन कॉलमुळे अगोदरच सर्वजण वैतागले असताना, आता निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून राजकीय पक्ष मोबाईलवर जाहिराती करून मतदाराला वेठीस धरत आहेत. फोनद्वारे राजकीय जाहिरातीतून मतदाराला आकर्षित करण्याचा प्रयत्न करत असून, मात्र अचानक येणाऱ्या अनोळखी फोन वरील राजकीय जाहिरातींमुळे सर्वसामान्यांसाठी डोकेदुखी ठरत आहेत. महाराष्ट्रात (20 नोव्हेंबर रोजी) विधानसभा निवडणुकीचे मतदान आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी मतदाराला आपलंसं करण्याच्या दृष्टीने सर्वच स्तरातून प्रयत्न केला जातो आहे. आपल्या पक्षाचे काम किती चांगले आहे हे सांगण्यासाठी पक्षाचे दिग्गज नेते मैदानात उतरले आहेत. ठिकठिकाणी त्यांच्या मोठ्या सभा देखील पार पडत आहेत. सोबतच सोशल मीडियाचा वापर करून राजकीय जाहिरातींच्या माध्यमातून जास्तीत-जास्त लोकांपर्यंत आपल्याच पक्षाला मतदान करण्यासाठी गरळ ओकली जात आहे. मात्र मोबाईल फोनवर राजकीय जाहिरातीची स्पर्धा बघायला मिळते आहे.

आत्ताच्या तरुण पिढीला सोशल मीडियाच महत्त्व समजत असले तरी, ज्येष्ठ व्यक्ती अथवा दुर्गम आदिवासी भागात मोबाईल नेटवर्क उपलब्ध होत नाही. त्यामुळे अनेकांकडे कॉलिंग

करण्यासाठीचा मोबाईल असतो. शहर ग्रामीण भागात मोबाईलवर फोन आलाच, तर पटकन उचलला जातो. त्यामुळे मोबाईल कॉलवर राजकीय जाहिराती केंद्रित केल्या आहेत. मोबाईलवर येणारा कॉल महत्वाचा मानून प्रत्येकजण उचलत असतो. मात्र राजकीय जाहिरातींच्या कॉलमुळे सर्वजण मेटाकुटीला आले आहेत. मोबाईलवर अनोळखी नंबरचा कॉल आला तरी अनेक जण उचलतात. खूप बिझी असल्यास कट करून थोडा वेळाने या क्रमांकावर फोन करतात. मात्र राजकीय पक्षाची कॅसेट या कॉल सुरू आहेत. आमचा पक्ष किती चांगला काम करतो आहे असे सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न राजकीय पक्ष करताना दिसतात. अशा अनोळखी मोबाईल क्रमांकावर फोन करायचा झाल्यास हा फोन अस्तित्वात नाही असे सांगितले जाते.

प्रिती बंड यांच्या 'ऑटो' चा वेग वाढला

बडनेरा मतदारसंघात ऑटो संघटनेचा जाहीर पाठींबा

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 10)– दिवसागणिक बडनेरा मतदारसंघात ताकद वाढत असलेल्या अपक्ष उमेदवार प्रिती बंड यांचे बोधचिन्ह असलेल्या 'ऑटो' चा वेग आणखीनच वाढला आहे. कारण ऑटो संघटनेने आपला जाहीर पाठींबा त्यांना घोषीत केला आहे.

बडनेरा विधानसभा मतदारसंघात अवघ्या काही दिवसातच प्रचाराची आघाडी घेतलेल्या प्रिती बंड यांच्या पाठीशी जनसामान्यांची ताकद उभी होताना दिसत आहे. सर्व स्तरातील मतदारांच्या मनात प्रिती बंड यांनी घर केले आहे.

रविवारी (दि.10) ऑटो संघटनेने जाधव पॅलेसमध्ये संघटनेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी एक सभा घेवून कुणाला पाठींबा द्यायचा यावर चर्चा केली. प्रिती बंड यांच्या पाठीशी उभी असलेली जनसामान्यांची शक्ती आणि गेल्या 15 वर्षात बडनेरा मतदारसंघाची झालेल्या परिस्थितीचा विचार करता, ऑटो संघटनेने प्रिती बंड यांना जाहीर पाठींबा दिला. यावेळी प्रिती बंड यांनी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. या सभेला यावेळी ऑटो संघटनेचे अध्यक्ष नितीन मोहोड, संतोष शेरेकर, संतोष भंडारकर, संतोष सोनटक्के, पंकज सुर्यवंशी, बाळू सखे यांच्यासह संघटनेचे अनेक पदाधिकारी, नाना नागमोते, उमेश घुरडे, अनिल सोनटक्के, डॉ.अल्वीना हक, बाबा राठोड, जीतु ठाकुर, विभा गौरखेडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

आजपासून 'ऑटो' च्या प्रचाराला लागू- मोहोड

प्रिती बंड यांच्या पाठीशी बडनेरा मतदारसंघातील जनशक्ती मोठ्याप्रमाणात उभी आहे. त्यामूळे आम्ही प्रिती बंड यांना जाहीर पाठींबा देत आहे. प्रिती बंड यांचे 'ऑटो' हे बोधचिन्ह असून उद्यापासून आम्ही 'ऑटो' या बोधचिन्हाचा प्रचार करणार असल्याचे संघटनेचे अध्यक्ष नितीन मोहोड यांनी सांगितले.

बाईक रॅलीद्वारे केली जनजागृती

दर्यापूर नगर परिषदेचा उपक्रम

महासागर प्रतिनिधी

दर्यापूर, (दि.10)– मतदानासंदर्भात विविध ठिकाणी जनजागृती मतदान करा, याकरिता संपूर्ण राज्यात वेगवेगळे उपक्रम राबवल्या जातात. देशाच्या विकासात व सशक्त लोकशाहीसाठी आपला सहभाग असावा, यासाठी हिरिरिने मतदानाचा हक्क बजावावा, असे प्रतिपादन तहसिलदार डॉ.रविंद्रकुमार कानडजे यांनी केले. दर्यापूर विधानसभा

निवडणूक 2024 करीता नागरिकांमध्ये जनजागृती व मतदानाचा टक्केवारी वाढावी यासाठी स्वीप अंतर्गत दर्यापूर नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने साईनगर व लगतच्या परिसरात बाईक रॅलीचे आयोजन गुरुवार (दि.7) करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. रवींद्र कानडजे बोलत होते.

सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीला सुरुवात करण्यात आली. साईनगर परिसरातील प्रमुख रस्त्यांवरुन जनजागृती बाईक रॅलीच्या माध्यमातून 100 टक्के मतदान करण्यासाठी सर्व मतदारांना आवाहन करण्यात आले. विविध घोषवाक्य म्हणून मतदारांना प्रभावित करण्यात आले. 18 वर्षावरील सर्व मतदारांनी आपले कर्त्यव्य म्हणून स्वयंस्फूर्तीने मतदान करावे असे आवाहन करण्यात आले. या रॅलीमध्ये परिसरात नागरिकांनी सहभाग घेतला होता. याप्रसंगी तहसीलदार डॉक्टर रवींद्रकुमार कानडाजे, मुख्याधिकारी तथा प्रशासक नंदू परळकर, कर निरीक्षक सुमेध खिराळे ,पिंक अंबेसिडर रिना तायडे व इतर अधिकारी, कर्मचारी व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, यांची उपस्थिती होती.

खिळखिळ्या बसमुळे प्रवाशांची गैरसोय

महासागर प्रतिनिधी

दर्यापूर,(दि.10) – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने ग्रामीण भागातील मार्गावर सोडलेल्या बसेसची दुरवस्था झाली आहे. खिळखिळ्या बसेसमुळे प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याने नाराजी प्रवाशी वर्गात आहे. याकडे संबंधित अधिकाऱ्यानी लक्ष देवून बसेसची दुरूस्थी करून घ्यावी किवा नविन बसेसची सोय करण्यात यावी असा सुर प्रवाश्यांमध्ये उमटत आहे.

आज दळणवळणाची विविध साधने उपलब्ध आहेत. मात्र,

प्रवाशांचा राज्य परिवहन महामंडळाच्या लालपरीवर आजही विश्वास कायम आहे. विशेषत- ग्रामीण भागातील प्रवाशांना बसशिवाय पर्याय नाही. त्यामुळे राज्य परिवहन मंडळाने एसटी बसमध्ये आमूलाग्र परिवर्तन करण्याची नितांत आवश्यकता आहे. आधी कोरोनामुळे एसटीची बस सेवा बंद होती. त्यानंतर कर्मचार्यांच्या संपामुळे एसटी बसची चाके थांबली. त्याचा देखभाल दुरुस्तीवर प्रचंड विपरीत परिणाम झाला. संपानंतर पुन्हा एसटी बस सुरू झाल्यावर अनेक कालबाह्य झालेल्या बसेस रस्त्यातच बंद पडू आजही अनेकदा एसटी बस बंद पडल्यामुळे रस्त्यात उभी असलेली आपल्याला दिसते. अनेक बसेस खिळखिळ्या झाल्या आहेत. त्यामुळे कधी बसचे चाक निघाल्याचे तर कधी खिडकी निखळून पडल्याच्या बातम्या आपल्याला वाचायला मिळतात. अनेक बसेसचे छत पावसाळ्यात गळताना प्रवाशांनी पाहिले. तर, अनेक बसेस नादुरुस्त झाल्याने आगारात उभ्या करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत.

प्रत्येक घटकाच्या विकासाचे गॅरंटी कार्ड म्हणजे मनसे!

पप्पू पाटील : लक्ष्मी नगर, सरस्वती नगर भागात पदयात्रा

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.10) – समाजातील युवा, बेरोजगार, महिला, शेतकरी, शेतमजूर, छोटे व्यावसायिक, कामगार अशा सर्व घटकांसोबतच ऐतिहासिक अंबानगरी अमरावतीचा नियोजनबद्ध विकास झाला पाहिजे ही माझी म्हणजेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची भूमिका आहे. मनसेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांचे मार्गदर्शन व नेतृत्वाखाली मी जनतेच्या माध्यमातून सर्व समाज घटकांना त्यांच्या विकासाचे गॅरंटी कार्ड देत असल्याची हमी अमरावती विधानसभा

मतदारसंघातील मनसेचे उमेदवार पप्पू उर्फ मंगेश पाटील यांनी पदयात्रेदरम्यान मतदारांसोबत संवाद साधताना दिली.

अमरावती विधानसभा मतदारसंघातील मनसे उमेदवार पप्पू उर्फ मंगेश पाटील यांनी मतदारसंघातील विविध भागात पदयात्रा व परिवर्तन नवनिर्माण यात्रा काढून आपल्या प्रचाराचा झंझावात कायम ठेवला असून मतदारांसोबत प्रत्यक्ष संवाद साधण्यासाठी त्यांनी लक्ष्मी नगर, सरस्वती नगर भागास भेट देत पदयात्रेच्या माध्यमातून मतदारांचा आशीर्वाद घेतला. याप्रसंगी उपस्थित मतदारांना आश्वस्थ करताना पप्पू पाटील म्हणाले की, प्रत्येक समाजातील माणसाचे विकासात्मक कल्याण व्हावे ही माझी प्रामाणिक इच्छा असून त्या दृष्टीने मी आज पर्यंत प्रयत्न केले. आपण मला एकवेळ आमदारकीची संधी दिल्यास या प्रयत्नांना मूर्त रूप मिळेल असेही पप्पू पाटील यावेळी म्हणाले. पप्पू पाटील यांना पदयात्रेदरम्यान मतदारांचा मोठा प्रतिसाद लाभत असून प्रत्येक ठिकाणी त्यांचे जंगी स्वागत करित आहे.

उठा पांडुरंगा प्रभात समयो पातला।

पहाटे काकडा आरतीच्या सूरांनी जागी होते गाव | थंडीत देखील ग्रामीण भागात नियमित आरती

बादल डकरे

चांदूर बाजार, (दि.10) – उठा पांडुरंगा प्रभात समयो पातला। वैष्णवांचा मेळा गरुड पारी दाटला।, असे म्हणत शेकडो वर्षांची परंपरा लाभलेल्या काकड आरतीला कोजागिरी पौर्णिमेपासून सुरवात झाली आहे, भल्या पहाटे काकड्याचे सूर कानावर पडत असल्याने गावोगावी भक्तिमय चैतन्यमय मंगलमय वातावरण पसरलेले आहे. कोजागिरी पौर्णिमेपासून तर त्रिपुरी पौर्णिमा पर्यत महाराष्ट्रात गावोगावी चालणारा काकड आरती मोठा धार्मिक उसत्व आहे. भल्या पहाटे ईश्वराला जागवून त्याचे नामस्मरण, आराधना करून दिव्याचे ज्योतीने

ओवाळने म्हणजे काकड आरती होय.

काकड आरती ग्रामीण भागात एक ही धार्मिक परंपरा अनेक वर्षापासून चालत आलेली आहे. गावागावातील मंदिरात टाळ मृदुंगाच्या गजरात काकड आरती गाव प्रदक्षिणा करते. काकड आरतीत लहानापासून तो मोठा पर्यंतचा सहभाग असतो. काकड आरती सुरू होताच सकाळी उठणाऱ्यांची संख्या वाढते. या वेळी गृहिणी सकाळी उठून सडा, रांगोळी काढतात. यावेळी सकाळी सगळीकडे प्रसन्न व चैतन्यमय वातावरणात असते. यावेळी गाव प्रदक्षिणा घालणाऱ्या काकड आरतीचे घरोघरी स्वागत पूजन केल्या जाते. काकड आरती ची सुरुवात सकाळी चार ते पाच वाजता सुमारास सुरू होते. हनुमान भजन, कृष्ण स्तुती, स्तोत्र, आरत्या म्हटले जातात, त्यानंतर प्रसाद वाटप होते. प्रात:काळी देवाचे नामस्मरण दिवसाची प्रसन्न सुरुवात थंडीच्या महिन्यात सकाळी उठण्याने आरोग्य चांगले रहावे व समाजात एकोपा रहावा या मागचा काकड आरतीचा खरा उद्देश.

शिवसेना नेत्या सुषमा अंधारेंची जाहीर सभा आज

फ्रेजरपुरा येथील सभेत करणार विरोधकांवर हल्लाबोल

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.10) – बडनेरा विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार सुनील खराटे यांच्या प्रचारार्थ शिवसेनेची मुलुखमैदानी तोफ, फायरब्रॅन्ड नेत्या सुषमा अंधारे यांची जाहिरसभा सोमवारी (दि.11 नोव्हें) अमरावती येथे पार पडणार आहे. सुनील खराटे यांनी प्रचारात आघाडी घेतली असून त्यांना अधिक बळ देण्यासाठी सुषमा अंधारे या मैदानात

उतरल्या आहे. फ्रेजरपुरा येथील सिद्धार्थ क्रीडा मंडळ मैदानावर सोमवारी सायंकाळी 6 वाजता या सभेचे आयोजन करण्यात आले असून या सभेमुळे विरोधकांच्या छातीत धडकी भरली आहे.

या जाहीर सभेला त्यांच्यासह महाविकास आघाडीचे सर्व नेते व पदाधिकारी देखील उपस्थित असणार आहेत. सुषमा अंधारे रविवारी सुषमा अंधारे यांचे विचार ऐकण्यासाठी महाविकास आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांनी तसेच बडनेरा मतदार संघातील नागरिकांनी सोमवारी सायंकाळी 6 वाजता फ्रेजरपुरा येथील सिद्धार्थ क्रीडा मंडळ मैदान येथे उपस्थित राहण्याचे आवाहन महाविकास आघाडीचे बडनेरा मतदार संघाचे उमेदवार सुनील खराटे यांनी केले आहे.